डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व संलग्न संस्थेतील सुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणा-या कर्मचा-यांना दिनांक 1 जुलै,2017 पासून महागाई भत्ता वाढ मंजूर करणेबाबत.

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थप्रशासन विभाग

वाचा: 1)शासन वित्त विभाग निर्णय क्र.मभवा.2017/प्र.क्र.11/सेवा-9, दिनांक:28 फेब्रुवारी, 2018.
2)शासन वित्त विभाग निर्णय क्र.निमवा.2018/प्र.क्र.75/सेवा-4, दिनांक: 16 मार्च, 2018.

## आदेश

क्र.अप्रवि/मभवा/निमवा/2018-19/2681 दिनांक :29/03/2018

शासनाने उपरोक्त शासन निर्णय दिनांक 28 फेब्रुवारी, 2018 व दिनांक 16 मार्च, 2018 अन्वये सुधारीत वेतनश्रेणीत वेतन व निवृत्ती वेतन घेणा-या कर्मचा-यांना दिनांक 1 जुलै, 2017 पासुन **मुळ वेतन अधिक ग्रेड वेतन** यांच्या एकूण रकमेवर दिनांक 1 जुलै, 2017 पासून 3 % दराने महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे म्हणजेच सध्याच्या 136 % महागाई भत्या ऐवजी वरीलप्रमाणे एकूण वेतनाच्या 139 % महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न अनुदानित संस्थातील कर्मचा-यांना दिनांक 1 जुलै,2017 पासुन उपरोक्त महागाई भत्याची वाढ लागु करण्यात येत आहे.

सदरहू महागाई भत्याची वाढ दिनांक **1 फेब्रुवारी, 2018 चे नियमित वेतन देयकात लागु करावी. तसेच माहे 1 जुलै, 2017 ते 01 जानेवारी, 2018 या कालावधीतील महागाई वाढीच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वत्रंतपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.** 1 **फेब्रुवारी**, 2018 ची महागाई भत्याची देयके माहे **फेब्रुवारी -2018 देय मार्च-2018** चे नियमित मासिक वेतन देयकात करावी किंवा त्यापुढील नियमित मासिक वेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पूरवणी देयके पारित केली जाणार नाहीत.

महागाई भत्ता वाढीच्या अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन **2018-19** चे मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

भाकृअप योजनातंर्गत **2018-19** करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिका-यांनी प्रस्तुत महागाई भत्यात वाढ विचारात घेवून त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी.

मा.कुलगरु महोदय यांच्या मंजुरीने....

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

प्रति:1) नियंत्रण अधिकारी(सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख(सर्व).
______________________________
2) प्राचार्य ______________________________
3) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पंदेकृवि, अकोला/नागपुर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना **1 फेब्रुवारी, 2018** पासुन निवृत्ती वेतनावर सध्याचा महागाई भत्ता दर 136% ऐवजी 139% लागु करण्यात येत आहे. माहे **फेब्रुवारी -2018 देय मार्च -2018** चे नियमित मासिक निवृत्ती वेतन देयकात प्रदान करणेत यावी. महागाई भत्ता अदा करण्यासाठी निवृत्ती वेतन अथवा वेतनाचे स्वतंत्र पुरवणी देयके आपण पारित करु नये.

नियंत्रक